# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

1. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

राज्य महाराष्ट्र State | जिल्हा मुंबई District | पोलीस ठाणे वा.प्र.वि. Police Station | पहिली खबर क्र. २८, FIR No. | वर्ष २०२५ Year | दिनांक ०८/०८/२५ Date

2. (i) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(ii) अधिनियम Act भ्र. प्रति. अधि. १९८८ कलमे Sections ७

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections भारतीय न्याय संहिता २०२३ कलमे Sections २३८

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून ०८/०८/२५ Date from ; वेळ Time ........ ; तारीख पर्यंत ०८/०८/२५ Date to ; वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख ०५/०८/२०२५ Date ; वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १८ ; तारीख ०८/०८/२०२५ Date ; वेळ १५:०५ Time

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name वि.भा.नगर पो.ठा. ; ठिकाणाचे नंबर No. if any ........ ; गल्ली Ward ........ ; रस्त्याचे नाव Name of road एस.सी.एल आर

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ ; गाव Village ........ ; पोस्ट Post ........ ; तालुका Taluka ........ ; जिल्हा मुंबई Dist. ; राज्य महाराष्ट्र State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ ; तालुका Taluka ........ ; जिल्हा Dist. ........ ; राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name अफजल असलम खान

(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name असलम खान

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४३ वर्षे

(d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय ; फोन नं. Phone No. ९९८४९५५८ ०३

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ ; दिल्याचा दिनांक Date of issue ........ ; दिल्याचे ठिकाण Place of Issue ........

(f) व्यवसाय Occupation ........

(g) धर्म Religion मुस्लिम ; ज्ञात Caste ........ ; जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address मेहताब बिल्डींग ; गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ ; घर/नाव नं. House Name No. बाबु कसाई गल्ली ; फोन/मो. नं. Phone No. ........ ; पॅन नं. Pan No. ........ ; वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road पाईपरोड ; जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ ; गाव Village कुर्ला (प) ; पोस्ट Post ........ ; पो. स्टे. P. Stn. वि.भा.नगर पो.ठाणे

तालुका Taluka ........ ; जिल्हा Dist. मुंबई ; राज्य State महाराष्ट्र ; सध्याचा पत्ता Present Address मेहताब बिल्डींग, बाबु कसाई गल्ली, पाईपरोड, कुर्ला (प)

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) जयश्री सुभाष सोंडे, वय-३२ वर्षे, पद- पोलिस उप निरीक्षक, विनोबा भावे नगर पो.ठा, मुंबई
२) जयप्रकाश बाबासाहेब माळी, अं.वय ५५ वर्षे, पद- पो.हवा-०५२६६, विनोबा भावे नगर पो.ठाणे मुंबई
(पाहिजे आरोपी)

खालील फिर्यादी अफजल असलम खान यांच्या स्वतंत्र पृष्ठावर टंकलिखित करण्यात आलेल्या जबाब हून गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल नोंदवण्यात येत आहे

समक्ष

ubhadkamkar

उज्वला भडकमकर

पोलीस निरीक्षक

सा.प्र.वि, मुंबई

[illegible]

आफजल खान

# फिर्याद

दिनांक ०६/०८/२०२५

मी अफजल अस्लम खान वय ४३ वर्षे, धंदा – व्यवसाय (प्लास्टीक ची भांडी विक्रेता), रा.ठी. मेहताब बिल्डींग, रुम नं, पहिला माळा, बाबु कसाई गल्ली, पाईप रोड, कुर्ला पश्चिम, मुंबई –४०००१०, मो.क्र. ९९८४१७५८०३, आधार कार्ड क्र. ५३४२३६३७२६५४.

मी वरीलप्रमाणे असून मागील ०४ वर्षापासुन माझे कुटुंबियासमवेत राहण्यास आहे. माझे मुळ गाव गोविंदापुर, तहसिल–बिरावा, जिल्हा–सितापूर, राज्य–उत्तरप्रदेश असून माझे सी.एस.टी रोड अर्पण हॉस्पिटल च्या शेजारी, कुर्ला पश्चिम येथे प्लास्टीक ची भांडी विक्रीचे दुकान आहे. सदर दुकान मी भाडेत्तवावर ०४ वर्षापासून चालवित असून त्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नातून माझा व कुंटुबियाचा उदरनिर्वाह चालवितो.

माझे मुळ गाव येथे असलेले चुलत भावांची मुले कैफ रिजवान खान व लुकमान सलीम खान यांना कामाकरीता मी मुंबई येथे घेवून आलो आहे. विनोबा भावे नगर पोलीस ठाणे च्या जवळ असलेली एचडीआयएल बिल्डींग मध्ये राहण्यास आहेत. ते दोघेही वातानाकूलीत संच (ac) ची कामे करुन त्यांचा उदारनिर्वाह चालवितात. त्यांचे मुंबई मध्ये कोणीही नातेवाईक नसल्याने मी त्यांना काही अडचण आल्यास पैशाची मदत करत असतो. दिनांक ०१/०८/२०२५ रोजी लुकमान सलीम खान चे वडील यांनी माझ्या मोबाईल वरील व्हॉट्सॲप वर विनोबा भावे नगर पोलीस ठाणे यांनी लुकमान यांच्यावर असलेल्या गुन्हयाच्या तपासकामी पोलीस ठाण्यास हजर राहण्याबाबतची नोटीस तसेच तपासी अधिकारी पीएसआय लोंढे मॅडम यांचा मोबाईल क्रमांक पाठविला होता. तेव्हा मी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यांनी मला विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथे माझे नातेवाईक कैफ रिजवान खान व लुकमान सलीम खान यांच्या विरुध्द गुन्हा नोंद केला असल्याबाबत सांगून दोघांनाही पोलीस ठाण्यास हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी उत्तरप्रदेश येथील त्यांच्या वडीलांना तसा फोन केला असता ते दोघेही उत्तरप्रदेश येथे असल्याचे सांगितल्याने मी त्यांना विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथे हजर करायचे आहे असे सांगितले. ते दोघेही उत्तरप्रदेश येथून मुंबई येथे आले असता त्यांनी मला गुन्हयातील फिर्यादी मोहम्मद फहद इंतासार खान याला केस मिटवून घेण्यासाठी लोंढे मॅडम यांच्या समक्ष बोलविले असल्याचे सांगितले. तेव्हा मी त्या तिघांना ही दिनांक ०३/०८/२०२५ रोजी विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी जयश्री लोंढे मॅडम यांच्या समक्ष हजर केले. सदरवेळी मॅडम यांनी मला बाहेर थांबण्यास सांगितले मी पोलीस ठाण्याच्या बाहेर थांबून होतो. आम्ही दुपारी ०१.०० वाजताच्या सुमारास पोलीस ठाण्यास आलो होतो व रात्री ११.०० वाजेपर्यंत आम्ही तेथे थांबून राहिलो.

त्यावेळी पीएसआय लोंढे मॅडम व पोलीसांनी कैफ रिजवान खान व लुकमान सलीम खान व फहद यांना खुप मारहाण केली. त्यांच्या ओरडण्याचा तसेच पोलीस कर्मचारी त्यांना शिव्या देत असल्याचे मी ऐकले. तसेच काही वेळानंतर लोंढे मॅडम यांनी तिघांनाही पोलीस कस्टडी मधून निघायचे असल्यास एक लाख रुपये दयावे लागतील, मी तिघांनाही पैसे दिल्या शिवाय सोडणार नाही असे म्हणाल्या. तेव्हा कैफ रिजवान खान व लुकमान सलीम खान व फहद हे मॅडम यांना आम्ही कामगार आहोत आम्ही कुठुन पैसे आणणार असे म्हणाल्यावर मॅडम यांनी त्यांना सोडायचे असल्यास तिघांनी ५०,०००/– रुपये दयावे लागतील असे सांगीतले. काही वेळानंतर लोंढे मॅडम यांनी मला त्यांच्या रुममध्ये बोलविले व तिघांना आता सोडण्याकरीता त्यावेळी माझ्याकडे १५,०००/– हजार रुपये लगेच दयावेत अशी मागणी केली. तेव्हा मी माझेकडील लोंढे मॅडम यांनी मागणी केलेले रुपये १५०००/– रु. रक्कम त्यांना दिली. तेव्हा त्यांनी कैफ रिजवान खान व लुकमान सलीम खान व फहद यांना रात्री ११.०० वाजता त्यांच्या कार्यालयातून सोडले व त्यांचे मोबाईल स्वत:कडे ठेवून घेतले. व जाताना उर्वरीत ३५,०००/–

अफजलखॉन

रुपये दिले नाही तर मी तिघांचे मोबाईल परत देणार नाही तसेच मी तुम्हाला केस मधून वाचविणार नाही असे लोंढे मॅडम यांनी सांगितले.

कैफ रिजवान खान व लुकमान सलीम खान यांनी मला सांगीतले की, आम्ही ३५,०००/– एवढे पैसे आमचेकडे नाहीत व पीएसआय लोंढे मॅडम यांना लाच देण्याची त्यांची इच्छा नाही. त्यामुळे मी त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यास सांगून वरळी येथे पाठवून दिले. त्यानुसार कैफ रिजवान खान हे दिनांक ०५/०८/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात तक्रार देण्याकरीता आले असता स.पो.आ. चंद्रकांत माळी व पो.नि.उज्वला भडकमकर यांना भेटले. कैफ व लुकमान यांना मराठी लिहता येत नसल्याने, त्यांची सदरची तक्रार ही पो.नि.भडकमकर यांनी संगणकावर हिंदीत टंकलिखीत करुन प्रींट काढली व ती समजावून सांगितली. दिलेली तक्रार बरोबर व खरी असल्याने सदर तक्रार अर्जावर कैफ याने सही करून दिली. दरम्यान मला पीएसआय लोंढे मॅडम यांनी संध्याकाळी तुम्हाला पैशाबाबत कॉल करते असे सांगीतले आहे असे कैफ यास कळविले असता मला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील अधिकारी स.पो.आ. चंद्रकांत माळी आणि पो.नि.उज्वला भडकमकर यांनी कार्यालयात बोलवून घेतले. तेथे मला कैफ यांनी दिलेला तक्रारी अर्ज समजावून सांगीतला. त्यावेळी मी सांगितले की, पीएसआय लोंढे हे मला दिनांक ०५/०८/२०२५ रोजी सायंकाळी मोबाईलवर कॉल करणार आहेत. त्यांचा मीस कॉल येवून गेलेला आहे. कैफ व लुकमान यांना लिहीता येत नसल्याने व लोंढे मॅडम माझ्या संपर्कात असल्याने या प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यासाठी मला त्यांनी अधिकारपत्र दिले आहे. त्यामुळे मी पुढील कार्यवाही करणार आहे.

पो.नि.भडकमकर यांनी लगेच पडताळणी कारवाई करणार असल्याचे सांगितले. पडताळणी कारवाई च्या अनुषंगाने लाप्रवि येथिल गोपनिय कक्ष येथे पो.नि.भडकमकर, स.पो.आ. चंद्रकांत माळी मी कैफ रिजवान खान व पंच आम्ही गेलो असता पो.नि.भडकमकर यांनी पंचांना मी महिला पोलीस अधिकारी श्रीमती जयश्री लोंढे यांना मोबाईलवरुन कॉल करणार असल्याचे सांगितले. व मोबाईलवरील संभाषण ते पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे मायक्रो एस.डी. कार्डमध्ये ध्वनिमुद्रीत करणार असल्याचे सांगून त्यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालू केला व मला कॉल करण्याचा इशारा केला असता मी श्रीमती जयश्री लोंढे यांना कॉल केला असता त्यांनी मला आप आज शाम को पुलीस स्टेशन आव, मुझे आपसे बात करनी है जरा, किसने आपसे पैसे मांगे है क्या और पुलीस स्टेशन मे... असे म्हणाल्या. मी त्यांना एक ढेड घंटे मे आता हू असे सांगीतले.

त्याप्रमाणे पो.नि.उज्वला भडकमकर यांनी मला पडताळणी कारवाई चालु करण्यात येत असून मला ३५,०००/– रुपये तयार ठेवण्याची सुचना दिली. त्यानंतर माझी सापळा पथकाशी ओळख करुन देऊन पोनि भडकमकर, सपोआ माळी, मी, कैफ, लुकमान तसेच दोन पंच व सापळा पथक अेसीबी वरळी कार्यालय येथून शासकीय वाहनांनी रवाना झालो. अदांजे रात्री ०८.०० वाजता आम्ही पोलीस ठाणे जवळील कोहिनूर बिझनेस स्कुल जवळ कोणास संशय येणार नाही असे रितीने थांबलो.

सदरवेळी पो.नि.भडकमकर यांनी पडताळणी दरम्यान होणारे संभाषण हे माझ्या शर्टाच्या आतील भागात लावण्यात येणाऱ्या डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मायक्रो एसडी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले व माझ्या सोबत पंच अबु बकार इक्बाल हे जाणार असल्याचे सांगितले व भडकमकर मॅडम यांनी माझे शर्टाचे आत बनियला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन लावला. त्यानंतर मी, कैफ रिजवान खान व शासकीय पंच अबु बकार इक्बाल नदाफ असे आम्ही पोलीस अधिकारी जयश्री लोंढे, विनोबा भावे नगर, पोलीस ठाणे, मुंबई यांना भेटाव्यास गेलो. त्यावेळी तेथे माझी भेट पोलीस अधिकारी जयश्री लोंढे यांच्याशी झाली. सदरवेळी पोलीस अधिकारी जयश्री लोंढे यांच्या समोर लोकसेवक माळी हे उपस्थित होते तेव्हा लोंढे मॅडम यांनी *जा सर माळी सर... ह्याला बाहेर घेवुन जा...* असे लोकसेवक माळी यांना उददेशुन म्हणाल्या. त्यानंतर लोकसेवक माळी हे आम्हाला

रुम मधून बाहेर घेऊन गेले व मला म्हटले की *क्या बोले...* त्यानंतर मी त्यांना म्हटलो की *मॅडम से कल बात हुई थी... मतलब घरवाले बोले थे... इनके घरवाले... बीस हजार रूपये पंधरा...* त्यावेळी माळी यांनी विचारले की, *अब तुम्हारे साथ मे है क्या...*तेव्हा मी लोकसेवक माळी यांना *पंधरा हजार रूपये मै मॅडम को दे चुका हु...*असे सांगितले त्यानंतर त्यांनी मला *हं....* असे म्हटले त्यानंतर मी लोकसेवक माळी यांना *मै बोला था बीस हजार लेलो... कल बोला था... और इनको बच्चे को फोन देदो... ये यहा रूकेंगे ... और जो वकार बचा है... वकार को मै बात करता हु... बुलवा दुंगा... मगर वकार से पैसे मत लेना...* तेव्हा लोकसेवक माळी मला *तो और कितना बोल रहे है...* असे विचारले असता मी त्यांना *बीस मै बोला था... बीस लेलो... मॅडम पैंतीस बोली थी पाच हजार व्यवस्था और हो गयी है... रिक्वेस्ट करने आया हु... पच्चीस लेलो पंधरा वो... तो पच्चीस और पंधरा चालीस हो गया...* असे लोकसेवक माळी यांना सांगितले. त्यावर लोकसेवक माळी यांनी मला *आप कितना लाया... अभी कितने लाये...* असे विचारले त्यावर मी त्यांना सांगितले की, *मै आया था बात करने... बोला दस मिनिट लगेगा... दुकान है... भाग के जाऊंगा... ऑनलाईन का सिस्टम नही रहता है...* त्यानंतर लोकसेवक माळी यांनी मला *मॅडम आपके... आपके तरफ देखके बात करती होंगी... वो टाईम मे उसने देखा... उनको लगा यही है... तब मारा... तो वैसा वो हायपर ज्यादा है... इसके लिये... ठिक है मॅडम कर देंगी सॉल्व... उसमे कुछ नही है... मॅडम तीस बोली है...* त्यावर मी लोकसेव माळी यांना *तीस... पैंतीस बोली थी...* असे सांगितले. त्यावर लोकसेवक माळी यांना *हा...* असे बोलले. त्यानंतर मी लोकसेवक माळी यांना *मै मतलब पच्चीस की व्यवस्था... दस नही हो पा रहा है... क्युंकी बच्चे है...* असे सांगितले त्यावर लोकसेवक माळी यांनी मला *फिर अभी कितना पच्चीस ला रहे है क्या...* असे म्हटले तेव्हा मी त्यांना *हा... दस पंधरा मिनिट का टाईम लगेगा...* असे सांगितले असता त्यांनी मला *ठिक है... लेके आव...*असे म्हणून जाण्यास सांगितले असता मी त्यांना दहा पंधरा मिनटात येतो असे सांगून आम्ही निघून आलो.

तेव्हा आम्ही सापळा पथक असलेल्या कोहिनूर बिझनेस स्कुल जवळ परत जाऊन सदरबाबतची सर्व माहिती भडकमकर मॅडम यांना दिली. त्यावेळी भडकमकर यांनी माझा आतिल भागास लावलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढला आणी त्यांनी व पो.नि.भडकमकर यांनी रेकॉर्डींग ऐकली असता लोकसेवक लोंढे यांनी लोकसेवक माळी यांच्या मार्फतीने पैसे मागितल्याचे निष्पन्न झाले त्यानंतर सर्व पथका समोर सपोआ माळी व पोनि भडकमकर यांनी सापळा कारवाईचे आयोजन केले. माझे बचतीतील व मित्रांकडून एकत्र केलेले रुपये २५,०००/– पोनि भडकमकर यांच्याकडे दिले असता त्यानी पथकातील अंमलदारकडून हिरव्या रंगाची पावडर लावण्यात आलेल्या रुपये २५,०००/– माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली, लोंढे मॅडम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास पायातील चप्पल काढुन बाजुला येवून इशारा करण्यास सांगितले.

त्यानंतर सपोआ माळी व पोनि भडकमकर यांनी विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथे सापळा लावला. त्यानंतर सुचनेप्रमाणे मी, पंच अबुबकार नदाफ, कैफ, लुकमान असे विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथे पायी पोहचलो. मी व पंच पाएसआय लोंढे मॅडम यांना भेटलो असता त्यांनी मला *सर को मिले क्या... कॉल करो ना सर को...* असे सांगितले त्यावर मी त्यांना *नंबर नही है मेरे पास...*असे म्हटले असता त्यांनी मला *लेलो नंबर...* असे म्हणून लोकसेवक माळी यांचा मोबाईल क्रमांक ९८९२७२५७२९ दिला आणी *ये सामने होगा... आगे जाव थोडासा... ये पिछे से... दरवाजा लगाव और जाव...*असे म्हणाल्या. त्यानंतर आम्ही बाहेर आलो असता बाहेरील बाजूस लोकसेवक माळी उभे होते. त्यांनी मला पाहताच *बहोत टाईम लगाया...* असे म्हटले. लोकसेवक माळी यांनी मला *आपके पास है ना...* असे विचारला असता मी त्यांना *हा...* म्हटले.त्यानंतर लोकसेवक माळी यांनी माझ्या सोबत असलेले पंच अबुबकार यांना *ठिक है... आप रूको उधर* असे म्हणून मला *बैठो ना गाडी मे...* असे म्हटले. त्यानंतर मी एकटाच लोकसेवक माळी यांच्या गाडी मध्ये बसलो. मी व लोकसेवक माळी असे दोघेच गाडी मधून पोलीस ठाणेपासून थोडया अंतरावर गेला असता माळी यांनी गाडी थांबविली तेव्हा त्यांनी मला *कितना लाये...* असे

विचारले असता मी त्यांना *पच्चीस हजार लाया हु पुरा... इधर से जाऊंगा कैसे... रास्ता भी नही मालुम है मेरे को... पच्चीस है पुरा... गिनलो... पच्चीस हजार पुरा...*असे म्हटलो त्यावर लोकसेवक माळी यांनी मला *पच्चीस है ना ?...* असे विचारले तेव्हा मी त्यांना *पच्चीस हजार पुरा... बराबर ना?..* असे बोललो. त्यानंतर लोकसेवक माळी यांनी मला गाडीतून उतरण्यास सांगून ते गाडी घेवून निघून गेले. त्यानंतर मी पुन्हा चालत येवून विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथे लोकसेवक जयश्री लोंढे यांना भेटून सांगीतले की, ये साहब जिसका नंबर दिये थे मै उसको पच्चीस हजार पुरे दे दिया हू अभी वकार से पैसा मत लेना. त्यावेळी लोंढे मॅडम यांनी मला *वो सर को दिये ?..* असे मला विचारले मी त्यांना *वो सर को दिये... वो आप बोले जिसका नंबर दिये थे... उसी को पच्चीस हजार पुरा दिया हु...* असे सांगितले. त्यावेळी सापळा पथकातील सपोआ माळी व भडकमकर मॅडम यांना समक्ष भेटून सांगीतले की, लोकसेवक माळी यांनी मला त्यांच्या गाडीमध्ये बसवून विनोबा भावे नगर पोलीस ठाणे पासून थोडया अंतरावर घेऊन जाऊन गाडीमध्येच लाचेची रक्कम २५,०००/–रुपये घेवून ते निघून गेले आहेत. त्यानंतर सपोआ माळी व पोनि भडकमकर यांनी पीएसआय लोंढे यांना सापळा कारवाईबाबत माहिती देवून लोकसेवक माळी यांचे मोबाईलवर त्यांना कॉल करण्यास सांगीतले असता त्यांना पोलीस ठाणेस पैसे घेवून येण्याबाबत सांगीतलेवर लोकसेवक माळी यांनी त्यांचा मोबाईल स्वीच ऑफ केला आहे. अशा प्रकारे लोकसेवक पीएसआय जयश्री सुभाष लोंढे मॅडम व पोलीस हवालदार जयप्रकाश बाबासाहेब माळी यांनी माझ्याकडून लाच घेतलेली आहे. म्हणून माझी त्यांच्याविरुध्द तक्रार असून कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा वर नमुद जबाब पोनि भडकमकर यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मला हिन्दी भाषेत समजावुन सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

UmBhadkamkar

( उज्वला भडकमकर )

पोलीस निरीक्षक

लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

[signature] अमजदखान

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर म तकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य राकुण रु २५०००/- (रू ५०० दराच्या ५० नोटा)

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

फिर्यादी यांचे नातेवाईकांविरुद्ध विनोबा भावे नगर पो.ठा, मुंबई येथे गुरक्र २७३/२५ कलम ३१८ भादवि अन्वये नोंद असून सदर गुन्ह्यामध्ये तपासी अधिकारी यांचेकडून जयश्री लोंढे यांनी मदत करणेकामी त्यांच्याकडे रू.१००००० /- लाच रक्कमेची मागणी करून फिर्यादी यांचे नातेवाईकांचे मोबाईल फोन ताब्यात घेऊन रू ५००००/- अन्त्यी मागणी करून दि 03/04/2025 रोजी रू.२५,०००/- इतकी लाचेची रक्कम आधीच जयश्री लोंढे यांनी स्विकारली असून उर्वरित रू २५०००/- दिले नाहीतर मो.फो परत करणार नाही व गुन्ह्यात मदत करणार नाही असे सांगितले. परंतु तक्रारदार यांना उर्वरित रक्कम देण्याची इच्छा नसल्याने दि 05/04/25 रोजी समक्ष लाप्रवि, मुंबई येथे येऊन तक्रार दिली. त्याअन्वये पंचासमक्ष दि 05/04/25 सापळा कारवाईमध्ये फिर्यादी यांना स्वतःच्या गाडीत बसवून पो.हवा माळी यांनी रू 25000/- पडताळणी जयश्री लोंढे यांच्या सांगण्यावरून त्यांचेवतीने रक्कम स्विकारली. पो.हवा माळी यांना लाप्रवि कारवाईचा संशय आल्याने ते लाचेच्या रक्कमेसह गाडी घेवून पळून गेले म्हणुन त्याअन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : उज्वला भडकमकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ......

(3) Transferred to P. S. ......

District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

अपठनीय / इंग्रजी

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name उज्वला भडकमकर

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 06/04/2025

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report